## दि.कि.अर्ज क्रमांक ३१३/२०२६ मध्ये निशाणी ०१ वरील आदेश

प्रस्तुत अर्ज मुंबई रेग्युलेशन VIII, १८२७ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी दाखल करण्यात आलेले आहे.

२. अर्जदारांचे असे म्हणणे आहे की, शशिकला गोविंद पाटील या दि.१०/०५/२०२६ रोजी श्री. विद्यासरोज हॉस्पीटल, नंदुरबार येथे मरण पावल्या आहेत. अर्जदारांचे असे म्हणणे आहे की, ते मयत शशिकला गोविंद पाटील यांचे मुलं आहेत. मयत शशिकला पाटील यांचे पती गोविंदराव दौलतराव पाटील हे त्यांच्या पुर्वीच मयत झालेले आहे. अर्जदार हे मयत शशिकला गोविंद पाटील यांचे एकमेव कायदेशीर वारस आहेत. अर्जदारांना मयत शशिकला गोविंद पाटील यांच्या वारस प्रमाणपत्राची शासकीय आणि निमशासकीय कामासाठी आवश्यकता आहे. त्यामुळे त्यांनी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

३. प्रस्तुत अर्ज दाखल झाल्यानंतर निशाणी १ वरील आदेशाचे अनुषंगाने अर्जदाराचे मार्फत 'नंददर्शन' ह्या दैनंदिन प्रसारीत होणारे वृत्तपत्रामध्ये दिनांक १८/०६/२०२६ रोजी जाहिर नोटीस प्रकाशीत करण्यात आली होती. ती नोटीस निशाणी १० नुसार अभिलेखावर आहे. तसेच जाहीर सुचना निशाणी ६ कडे दाखल आहे. वृत्तपत्रात नोटिस प्रसिध्द केल्यानंतर कुणीही आजपर्यंत अर्जास हरकत घेतलेली नाही. अर्जाच्या अनुषंगाने अर्जदार क्र. २ ने त्याचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी ११ अन्वये सादर केले आहे. तसेच त्याने मयत शशिकला गोविंद पाटील यांचे मृत्यु झाल्याबाबत मृत्यु प्रमाणपत्र निशाणी १२ कडे दाखल केलेले आहेत. तसेच अर्जदारांनी निशाणी १३ व १४ कडे अर्जदारांचे आधार कार्डची पडताळणी केलेली प्रत दाखल केली आहे. तसेच अर्जदारांच्या वडिलांच्या मृत्यु प्रमाणपत्राची प्रत निशाणी १५ कडे दाखल केलेले आहे. अर्जदार क्र. २ ने दाखल केलेल्या शपथपत्रावरुन त्याने त्याच्या अर्जातील कथनांना पुरेपुर साक्षी पुराव्याचा आधार दिलेला आहे. त्यामुळे अर्जदारांनी त्यांचा अर्ज साक्षीपुराव्याचे व दस्तऐवजांचे आधारे सिध्द केल्याचे निदर्शनास येत आहे. अर्जदारांनी शपथेवर कथन केले आहे की, ते मयत शशिकला गोविंद पाटील यांचे एकमेव वारस आहेत. कायदेशीर तरतुदींचा विचार करता अर्जदार हे मयत शशिकला गोविंद पाटील यांचे वारस आहेत. म्हणुन खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

अर्जदार हे मयत शशिकला गोविंद पाटील यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्याबाबतचे आवश्यक न्यायालयीन शुल्क भरल्यावर देण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by BHANUPRATAP BASANTSINGH CHOUHAN
Date: 2026.08.03 17:24:30 +0530

भानुप्रताप चौहान
सह दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर.
नंदुरबार.

दि.०३.०८.२०२६

# <u>CERTIFICATE</u>

I affirm that the contents of this PDF file Order /Judgment are same word to word, as per the original Order /Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | P. M. Gomte |
| Court | : | Jt. Civil Judge Senior Division and Nandurbar. |
| Date | : | 03.08.2026 |
| Judgment /order signed by the Presiding Officer on | : | 03.08.2026 |
| Judgment /order uploaded on | : | 03.08.2026 |